‘अम्मी’ आणि ‘पंडितजी’



बहुरंग



सुरेशचंद्र नाडकर्णी

“अहाहा... क्या बात है!”

अवचित दाद मिळाली आणि बेगम अख्तरनी चमकून पाहिलं...

श्रोत्यांत थोडेसे दूर कुणी पोरगेलासा युवक आपल्याच तंद्रीत गाणे ऐकत बसला होता... कोणत्याही क्षणी घडणारी, वरकरणी क्षुल्लकच वाटणारी घटना... पण त्यातून पुढे अगणित संगीत रसिकांना भरभरून आनंद मिळणार होता...

नागपूरमधील हज़रत ताजुद्दीन बाबांचा दर्गा हे अनेक भाविकांचं, विशेषत: संगीत क्षेत्रातील कलावंतांचं श्रद्धास्थान. अनेक कलावंत तेथे आवर्जून हजेरी लावतात. स्वत: हजरत ताजुद्दीन बाबा संगीताचे मोठे जाणकार होते, असे म्हणतात... ‘मलिका-ए-गज़ल’ बेगम अख्तर पंचविशीतील ‘बाई अख्तरीबाई फैजाबादी’ होत्या.. त्या बाबांच्या सेवेत कला पेश करीत होत्या आणि श्रोतृसमुदायात बसलेला तो युवक होता ‘देशपांडेताईंचा वसंता.’

अम्मी (बहुतेक निकटवर्ती बेगम अख्तर यांना अतीव प्रेमादराने ‘अम्मी’ असे संबोधत.) किरवाणीच्या सुरावटीतील दादरा पेश करीत होत्या...

“हो गयी बेरिया पियाके आंवन की...”

‘हो गयी’हे शब्द आळवताना एक लहानसाच बेहलावा सहजगत्या डोकावून गेला. त्यात प्रत्ययाला येणारी मेरखंडी (स्वरांची वैविध्यपूर्ण उलटसुलट जुळणी) इतकी सहजसुलभ होती की, जाणकारांच्या कळत-नकळत तर सरूनही गेली, किंवा अनावधानानं बहुसंख्य रसिकांच्या ध्यानात आली नसेल. परंतु त्या पोरसवदा युवकाने मात्र ‘क्या बात है!’ म्हणून उत्स्फूर्त दाद दिली. दिल्लीच्या पारंपरिक ‘कव्वालबच्चे’ घराण्यातील मेरखंडी पलटे जाणणारा कुणी रसिक नागपुरात असेल, अन् तोही इतका कोवळ्या वयाचा, यावर विश्वास बसणे कठीण होते.

मैफल संपली. बेगमनी त्या युवकाला बोलावून घेतले. ठेंगणाठुसका बांधा, गळकी अर्धी विजार, घरी धुतलेला अर्ध्या बाह्यांचा शर्ट, मागे वळविलेले केस, भुवयांच्या मध्यभागी शेंदुराचा अस्पष्ट टिळा अन् गळ्याजवळ भस्मचर्चित बोट टेकलेले असा हा कोवळा, मिसरूडही न फुटलेला युवक समोर हात जोडून उभा राहिला. मध्यमवर्गीय पांढरपेशा कुटुंबातील वाटणारा तो युवक अस्खलित ऊर्दू बोलत होता. इतकेच नव्हे, तर ऊर्दू अदबच्या शिष्टाचारातही पूर्णपणे रुळलेला होता. अम्मींच्या आश्चर्याला पारावारच उरला नाही. ‘देशपांडेताईंचा हा वसंता’ बोलत गेला आणि कोडे उलगडत गेले... त्याने लाहोरमध्ये मामाकडे राहून पतियाळा खानदानची तालीम असदअली खाँसाहेब यांच्याकडून हासिल केली होती. साहजिकच त्याला दिल्लीच्या ‘कव्वालबच्चे’ घराण्याचे मेरखंडी पलटे पूर्णपणे अवगत होते.

हा ‘वसंता’ म्हणजेच पुढे ख्यातनाम झालेले चतुरस्त्र प्रतिभावंत गायक आमचे गुरुवर्य डॉ. वसंतराव देशपांडे.

योगायोगाने जमून आलेल्या या परिचयाचे स्नेहात आणि नंतर अतिघनिष्ट स्नेहबंधात रुपांतर झाले. अम्मींना वसंतरावांच्या असामान्य प्रतिभेबद्दल आणि चतुरस्त्र गायकीबद्दल नितांत आदर होता. अम्मी त्यांना ‘पंडितजी’ म्हणत असे, आणि ‘अम्मी’ हे वसंतरावांचे श्रद्धास्थान होते. केवळ अम्मींच्या अतीव आग्रहामुळेच वसंतराव ‘सैन्य लेखा’ विभागातली नोकरी सोडून पेशावार गायक बनले आणि त्यानंतरच या प्रतिभावंत तेजस्वी गायकाचे दर्शन रसिकांना घडले.

वसंतरावांनी सैन्य लेखा विभागात काम करणे अम्मींना मुळीच पसंत नव्हते. त्या नेहमी म्हणत, “पंडतजी, क्या रख्खा है इस मुलाजमितमें?- आप बड़े फनकार हैं... आप सिर्फ संगीतही में रहिए... वोही आपकी तबीयत है...” परंतु घरी आई, पत्नी, लग्नाच्या दोन मुली आणि मुलाचे शिक्षण या सर्वांचा विचार करता नोकरी सोडून व्यावसायिक गवई बनणे म्हणजे निदान त्या काळी तरी देशोधडीला लागण्यासारखेच होते. वसंतराव अम्मींचे बोलणे हसण्यावारी नेत.

कालांतराने ईशान्य भारतातील ‘नेफा’ परिसरात वसंतरावांची बदली झाली. वसंतरावांना ब्रम्हांड आठवले. आधीच रक्तदाब, पोटातील अल्सर आणि मधुमेहासारख्या व्याधींनी शरीर पोखरलेले त्यात आता घराबाहेर राहायचे... पण सर्व काही सहन करायलाच हवे होते. कारण पेन्शन बसण्यासाठी अजून वर्षभर तरी नोकरी करणे आवश्यक होते. मन घट्ट करून वसंतराव निघाले. ‘निरोप द्यायला घरातील सगळे आले होते. व्याकुळ रडवेली झालेली पत्नी लतिका, तिच्या पदराला धरून मागेपुढे घोटाळणारी आणि स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवरील गर्दीमुळे अधिकच कावरीबावरी झालेली लहानगी मुले, पाणावलेल्या डोळ्यांनी त्या सर्वांना समजावणारी, वृद्ध होत चाललेली आणि वसंतरावांना जन्मभर मायेच्या पंखाखाली घेऊन एकटीने संसाराचा गाडा रेटणारी, परंतु आता थकत



चाललेली ताई...’

डोळ्यांसमोर आता फक्त एकच विरंगुळा दिसत होता. जाता जाता अम्मींकडे थांबायचे.

अम्मी आणि त्यांचे यजमान बॅरिस्टर इश्तियाक अहमद लखनौ स्टेशनवर घ्यायला आले. एक दिवसाच्या मुक्कामानंतर वसंतराव बदलीच्या जागी गेले. तेथे दोन-तीन महिने त्यांनी कसेबसे हालातच काढले आणि पुन्हा अम्मींनी बोलावले म्हणून लखनौला आले. मी पुण्याहून गेलो. अम्मींच्या बंगल्यात हिरवळीवर गालिचे वगैरे अंथरून सुंदर बैठक सजविण्यात आली होती. प्रसन्न वातावरणात दोन-चार दिवस गाणे-बजावणे झाले आणि अम्मींनी पुन्हा विषय काढला, अन् वसंतरावांनी आम्हा सर्वांनाच धक्का दिला. वसंतराव उद्गारले, “मैने तय कर लिया है... मैं नौकरी छोडकर वापस जा रहा हूँ...” वसंतरावांचा निश्चय झाला होता.

अम्मींना जणू हे ठाऊक असल्याप्रमाणेच त्यांनी पुण्याची तिकिटे रिझर्व्ह करून आणली होती. केवढं प्रेम त्या थोर मनाच्या स्त्रीचे! कोण कुठला वसंतराव देशपांडे? दूरच्या महाराष्ट्रातला... ना त्यांच्या जातीचा ना धर्माचा, ना त्यांच्या वयाचा... प्रतिष्ठेचा वा आर्थिक योग्यतेचा... निर्व्याज प्रेमाला असले कोणतेच नियम लागू नसतात...

भरल्या डोळ्यांनी, परंतु अत्यंत समाधानाने अम्मी लखनौ स्टेशनवर निरोप द्यायला आल्या. सतत चुकत जाणारे मूल केव्हा तरी शहाण्यासारखे वागू लागते तेव्हा आईला अवर्णनीय आनंद होतो. तो आनंद अम्मींच्या डोळ्यातून टपटपत होता.

गाडीच्या खिडकीजवळ प्लॅटफॉर्मवर उभ्या राहून अम्मी गहिवरलेल्या आवाजात वसंतरावांना म्हणाल्या, “अब ट्रेन छुटने तक कुछ तो भी अच्छासा मेरे कानों में गुनगुनाते रहिए...”

आभाळाएवढे मन असणारी मुलुखावेगळी अशी ही एक ‘अम्मी’ अन् मुलाहून मूल असलेले तिचे हळवे, पण असामान्य गुणवान पोर. ते हृद्य नाते आमच्या मनात अजून रूणझुणत राहिले आहे...